follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 ✲ वर्ष २५ ✲ अंक २८८ सातारा ✲ बुधवार ✲ दि. ३ जुलै २०२४ ✲ पाने ८ ✲ किंमत ५ रू/

# सत्संगात चेंगराचेंगरी होऊन जवळपास १०० जणांचा मृत्यू

## अनेक जण जखमी; हाथरसमधील घटना



**उत्तर प्रदेश :** हाथरसमध्ये सत्संगात चेंगराचेंगरी होऊन भीषण दुर्घटना घडली असून यामध्ये २७ जणांचा मृत्यू झाला तर सुमारे १०० लोक जखमी झाले आहेत.

उत्तर प्रदेशात मोठी दुर्घटना घडली आहे. हाथरसमध्ये चेंगराचेंगरी होऊन ५० जणांचा मृत्यू झाला आहे. उत्तर प्रदेशच्या हाथरसमध्ये सत्संगात चेंगराचेंगरी होऊन भीषण दुर्घटना घडली असून यामध्ये ५० जणांचा मृत्यू झाला असून अनेक लोक जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भोले बाबांचा सत्संग कार्यक्रम सुरु होता यावेळी अचानक चेंगराचेंगरी झाली. उत्तर प्रदेशच्या हाथरसमधील रतिभानपूर येथे ही दुर्घटना घडल्याची माहिती आहे. या सत्संगाचा समारोप कार्यक्रम सुरु होता. यावेळी ही दुर्घटना घडली आहे.

**हाथरसमध्ये चेंगराचेंगरी होऊन मोठी दुर्घटना**

उत्तर प्रदेशातील हाथरसमध्ये चेंगराचेंगरीची घटना घडली आहे. चेंगराचेंगरीत अनेकांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. जिथे ही चेंगराचेंगरी झाली तिथे सत्संग सुरु होता. ही घटना हाथरसच्या रतिभानपूर भागातील असल्याची माहिती आहे. भोले बाबांच्या सत्संगाचा समारोप सोहळा सुरू असतानाच चेंगराचेंगरी झाल्याचं सांगण्यात येत आहे. या चेंगराचेंगरीत जखमी झालेल्या लोकांना उपचारासाठी एटा मेडिकल कॉलेजमध्ये नेण्यात आलं आहे.

**जखमींमध्ये महिला आणि लहान मुलांचा समावेश**

उत्तर प्रदेशच्या हाथरस जिल्ह्यातील सिकंदरराव पोलीस स्टेशन हद्दीतील फुलराई गावात भोले बाबांच्या सत्संगात चेंगराचेंगरी झाली, त्यात २३ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती एटा रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. उमेश कुमार त्रिपाठी यांनी केली आहे. दरम्यान, मृतांमध्ये दोन पुरुष आणि २५ महिलांचा समावेश आहे. अनेक जण जखमी झाले असून त्यामध्ये महिला आणि लहान मुलांचा समावेश आहे.

ही घटना एका धार्मिक सत्संगादरम्यान घडली, ज्यामुळे गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरी होऊन अनेक भाविकांचा मृत्यू झाला, तर काही जण जखमीही झाले आहेत. शवविच्छेदन तपासणी आणि पुढील कार्यवाहीसाठी मृतांचे मृतदेह एटा मेडिकल कॉलेजमध्ये पाठवण्यात आले आहेत.

# अजितदादांच्या मुखात तुकोबा आले, लोकसभेचा परिणाम झालेला दिसतोय, जयंत पाटलांचा टोला



**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाषणाची सुरुवात जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या ओवीने केली. अजितदादांच्या मुखात तुकोबा आले म्हणजे लोकसभेचा परिणाम झालेला दिसतोय. असं माझ्यासारख्या कार्यकर्त्याला वाटतं. तुकाराम महाराज मवाळ होते, पण दांभिकपणावर त्यांनी कठोर प्रहार केले. त्यामुळे माझ्याही भाषणाची सुरुवात तुकाराम महाराजांच्या ओळीने करतो. तुकाराम महाराज म्हणतात घासावा शब्द तासावा शब्द, फुलावा शब्द बोलण्याप्रूवी. बोलावे मोजके खमंग आणि खमके, असे शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले. ते विधानसभेत बोलत होते. यावेळी जयंत पाटलांनी अजित पवार यांना शाब्दिक टोले लगावले.

शिवराजसिंह चव्हाणांना परत मुख्यमंत्री होता आलं नाही

जयंत पाटील म्हणाले, शिवराजसिंह चव्हाण यांनी लाडकी बहिण ही योजना राबवली. त्या राज्यात म्हणजे मध्यप्रदेशमध्ये ही योजना लोकप्रिय झाली. मात्र, शिवराजसिंह चव्हाणांना परत मुख्यमंत्री होता आलं नाही. एकनाथ शिंदेंना हे माहिती आहे की नाही? हे मला माहिती नाही. या योजनेमुळे त्यांच्यावर काय संकट आहे, हे त्यांच्या लक्षात आलेले नाही. त्यामुळेच एकनाथ शिंदेंनी ही योजना अजित पवारांना मांडण्यास सांगितले.

पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले, एक उज्ज्वला नावाची योजना केंद्र सरकारने वाजत गाजत आणली होती. बॅनर लावले होते, गॅसचे कनेक्शन सर्वांना दिले. सर्व देशभर महिलांचे फोटो लावण्यात आले. उज्ज्वला योजनेमुळे आम्हाला फायदा झाला, असे दावे करण्यात आले, पण पुढे काय झाले आपणा सर्वांना माहिती आहे,असंही जयंत पाटील यांनी नमूद केलं.

जयंत पाटलांचा एकनाथ शिंदेंवरही पलटवार

जयंत पाटील यांच्यापूर्वी विधानसभेत एकनाथ शिंदे यांनीही जोरदार फटकेबाजी केली. महाविकास आघाडीतील स्पर्धेत जयंतराव सर्वांत पुढे आहेत. त्यामुळेच नाना पटोले फिल्डवर उतरले आहेत, असा टोला एकनाथ शिंदे यांनी लगावला होता. शिवाय, जयंतराव तुम्ही नकली वाघांसोबत आहात, जरा असली वाघांसोबत या, असंही शिंदे यांनी म्हटलं होतं. त्यानंतर जयंत पाटलांनी शिंदेंना जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. लाडकी बहिण योजना राबणारे शिवराजसिंह चव्हाण पुन्हा मुख्यमंत्री झाले नसल्याचे जयंत पाटील म्हणाले.

# ऋण काढून सण करायला लावणारा अतिरिक्त अर्थसंकल्प; विजय वडेट्टीवार यांची घणाघाती टीका



**मुंबई :** राज्याचे उत्पन्न घटले आहे. राज्यात विजेची निर्मिती कमी झाली. उद्योग बाहेर गेले. यावरून राज्याची आर्थिक स्थिती मंदावल्याचे दिसून येते. तरी केवळ घोषणांचा पाऊस पाडला जात आहे. वित्तीय तूट कशी भरून काढणार याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे. खिशात नाही आणा आणि मला बाजीराव म्हणा, अशी सरकारची परिस्थिती आहे. राज्यावर कर्जाचा, व्याजाचा बोजा वाढत आहे. विकास दराची गती मंदावली आहे. महागाईने उच्चांक गाठला आहे. प्रत्येक गोष्टीवर जीएसटी लावल्याने गरीबांचे हाल सुरू आहेत. कर्ज आणि व्याज यांमुळे कर आकारणीत वाढ केली जात आहे. सरकारच्या या आकड्यांच्या जगलरीमुळे राज्यावर साडेसात लाख कोटींच्यावर कर्जाचा आकडा जाणार आहे. त्यामुळे खोदा पहाड निकला चुहा, अशी या अर्थसंकल्पाची परिस्थिती आहे, या शब्दांतकाँग्रेसनेते आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेतेविजय वडेट्टीवारयांनी अर्थसंकल्पावर हल्लाबोल केला.

विधानसभेत अतिरिक्त अर्थसंकल्पावरविधानसभाविरोधी पक्षनेतेविजय वडेट्टीवारयांनी चर्चेला सुरूवात केली. यावेळी वडेट्टीवार यांनी महायुतीला धारेवर धरले. अतिरिक्त अर्थसंकल्प राज्याला कर्जबाजारी करणारा आहे. गेल्या दोन वर्षात महायुतीने २ लाख कोटी रूपये कर्ज काढले आहे. आता निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केलेल्या फसव्या घोषणांसाठी १ लाख कोटी रूपयांचे कर्ज काढून राज्याला खड्ड्यात घालण्याचे नियोजन या अतिरिक्त अर्थसंकल्पात केले आहे. १ लाख १७ हजार कोटी रूपये कर्जाचा हप्ता जाणार आहे.

त्यामुळे ऋण काढून सण करायला लावणारा हा अतिरिक्त अर्थसंकल्प आहे. जुन्या योजनांचा निधी कमी करायचा नव्या फसव्या योजनांची घोषणा करायची, अशी या सरकारच्या कामाची पद्धत आहे. महाराष्ट्राला गुजरातच्या मागे नेण्याचं महापाप या सरकारन केले आहे, या शब्दांत वडेट्टीवार यांनी हल्लाबोल केला.थकित वीज बील माफ करण्यात यावेराज्याचा आर्थिक विकास हे उद्दिष्ट न ठेवता केवळ राजकीय उद्दीष्ट ठेवून हा अर्थसंकल्प सादर केला आहे. त्यामुळे हा अतिरिक्त अर्थसंकल्प आहे की महायुतीच्या निवडणुकीचा जाहीरनामा आहे की निवडणुक जुमला आहे असा प्रश्न जनतेला पडला आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे ६५ हजार कोटींचे थकित वीज बील माफ करण्यात यावे, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. सत्तेचे वाटेकरी एकमेकांवर कुरघोडी करत असल्याने राज्याची परिस्थिती बिघडली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली पण अर्थसंकल्पाला मंजूरी मिळण्याआधीच शासन निर्णय काढला. आमच्या भगिनी या सरकारच्या भूलथापांना बळी पडणार नाहीत. मुख्यमंत्र्यांनी गरज नसताना संसदेतील विरोधी पक्षनेते राहूल गांधी यांचा उल्लेख केला. हे योग्य नव्हते, असे वडेट्टीवार यांनी सांगितले.दरम्यान, मुलींच्या परदेशी शिक्षणाची योजना फसवी आहे. अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना तेलंगणात जास्त मानधन आहे. महाराष्ट्रात मात्र उपेक्षाच आहे. बार्टी, सारथी, अमृत, महाज्योती या संस्थात गैरप्रकार होत आहेत. सरकारने महामंडळांच्या घोषणा केल्या पण निधीची तरतूद केली नाही. मुख्यमंत्र्यांकडे असलेल्या सामाजिक न्याय विभागात मोठा भ्रष्टाचार आहे. परदेशी शिष्यवृत्तीसाठी निधी नाही, त्यामुळे मुलांची फसवणूक होत आहे. शेतकऱ्यांसाठी योजना आणता, स्मारकांच्या घोषणा करता, शिष्यवृत्या जाहीर करता पण त्यासाठी तुम्ही निधी देत नाही. त्यामुळे तुमच्या भूलथापांना जनता बळी पडणार नाही. अर्थमंत्री अजित पवार यांची महाविकास आघाडीत असताना अर्थसंकल्प सादर करताना देहबोली होती तशी आता दिसून येत नाही. अर्थमंत्र्यांवर कूरघोडी केली जातेय. महायुतीमधीलच लोक अर्थमंत्र्यांची समाजमाध्यमांमध्ये खिल्ली उडवण्याची व्यवस्था करतात. भाजपाने तर दादांना अग्निवीर केले आहे. त्यामुळे दादांनी शेजाऱ्यांपासून जपूर रहावे, असा सल्ला विजय वडेट्टीवार यांनी दिला.

# माझी लाडकी बहीण योजनेवरून पृथ्वीराज चव्हाण यांनी सरकारला झोडपले; नेमके काय म्हणाले?



**मुंबई :** आमदार चव्हाण म्हणाले, लाडकी बहिण योजनेच्या १५ जुलै अंतिम नोंदणीच्या तारखेमुळे राज्यात नोंदणी केंद्राबाहेर मोठी गर्दी होत आहे. राज्यात काही भागात उन्हाची तीव्रता अजून असल्याने काही महिलांना भोवळ आल्याची घटना घडल्या आहेत. काही भागात पावसातही रांगा लागल्या आहेत, याकडेही चव्हाण यांनी सरकाचे लक्ष वेधले.

महाराष्ट्रात पंढरपूरची वारी सुरू आहे. आषाढी एकादशी १७ जुलैला आहे. या वारीत जवळपास १० लाख वारकरी सहभागी होतात. या वारीत निम्याहून अधिक महिला भाविक असतात. अशावेळी या योजेनच्या नोंदणीसाठी भाविक महिलांनी वारी सोडून यायचे का? असा खडा सवाल सरकारला केला.

प्रत्येक महिलेला तिचा अधिकार मिळालाच पाहिजे. ही योजना फक्त निवडणुकीपुरती सुरू करायची व त्यानंतर बंद करायची हे योग्य होणार नाही. केंद्रातील यूपीए सरकारने ज्याप्रमाणे अधिकारावर आधारित कायदे केले होते, त्याप्रमाणे या योजनेचाही कायदा करावा, अशी अग्रहाची मागणीही त्यांनी केली.

या योजनेत २१ वर्षावरील अविवाहित महिलांना वगळले आहे, त्यांचा काय दोष आहे ? त्यांना या योजनेचा फायदा मिळालाच पाहिजे. त्याचबरोबर ६० वर्षावरील सर्व महिलांना ज्यांना कोणी सांभाळणारे नसतील तर अशा वयोवृध्द महिलांना या योजेतून वगळणे योग्य नाही. त्यावर मुख्यमंत्री शिंदे यांनी वयोमर्यादा ६५ वर्षे केल्याची जाहीर केले.

लाडकी बहीण योजनेमुळे डरवज्ञळ डशज्ञ डलहशाश नोंदणी केंद्राबाहेर एजंटचा सुळसुळाट झाला आहे. महिलांना उत्पानांचा दाखला काढण्यासाठी ७००-८०० रुपये मागितले जात आहेत, असा आरोप करुन आमदार पृथ्वीराज चव्हाण यांनी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरचा तुटवडा झालेला आहे. या त्रुटी शासनाने लवकरात लवकर दूर केल्या पाहिजेत, अशी मागणीही केली.

# अंबादास दानवे पाच दिवसांसाठी निलंबित

## विधान परिषदेत बहुमताने ठराव मंजूर

**मुंबई :** विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे विधान परिषदेतून पाच दिवसांसाठी निलंबित करण्यात आले. विधान परिषद सभागृहात बेशिस्त वर्तन केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला. संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दानवे यांच्या निलंबनाचा ठराव विधान परिषदेत वाचून दाखविला. उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी तो आवाजीमताने मंजूर केला. तसेच निलंबनाच्या काळात विधानभवनाच्या परिसरात त्यांना येण्यास ही बंदी घातली. उपसभापतींनी अचानक निलंबनाचा निर्णय जाहीर केल्याने विरोधकांनी आक्रमक होत, सभागृहात घोषणाबाजी देत गोंधळ घातला. ही पक्षपाती भूमिका आहे, असा आरोप करत विरोधकांनी सभात्याग केला. तत्पूर्वी सत्ताधारी व विरोधकांच्या गोंधळात उपसभापती गोऱ्हे यांना तीनवेळा सभागृहाचे कामकाज तहकूब करावे लागले.

लोकसभेत भाजपवर निशाणा साधताना राहुल गांधी यांनी काल हिंदुत्वावर भाष्य केले. विधान परिषदेत याचे तीव्र पडसाद उमटले. भाजपचे प्रसाद लाड यांनी निषेधाचा ठराव मांडण्याची मागणी केली. दरम्यान, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि लाड यांच्यात तूतू- मैंमैं झाली. दानवेंनी भर सभागृहात लाड यांना आक्षेपार्ह विधान केले. मंगळवारी परिषदेचे कामकाज सुरू होताच, भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी राज्यातील माजी नेत्यांचे दाखले देत, विरोधी पक्षनेते दानवे यांच्या विधानांचा समाचार घेतला. दानवे यांनी विधिमंडळाच्या परंपरेला काळीमा फासण्याचे काम केले. त्यांना निलंबित करा, अन्यथा कामकाज होऊ देणार नाही, असा पवित्रा घेतला. यावेळी झालेल्या गोंधळात उपसभापती गोऱ्हे यांनी सकाळी एक तासासाठी सभागृहाचे कामकाज तहकूब केले. त्यानंतर गोंधळात आणखी दोन वेळा सभागृहाच कामकाज तहकूब केले.

दुपारी दोन वाजता सभागृहाचे कामकाज सुरु होताच संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ठराव मांडला. १ जुलै रोजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सभागृहात चर्चा करीत असताना सभागृहाचे सदस्य प्रसाद लाड यांच्या बाबत आक्षेपार्ह, अशोभनीय, अश्लाघ्य शब्द वापरुन व बेशिस्त वर्तन करून सभागृहाची प्रतिष्ठा मलिन केली. तसेच सर्वोच्च सभागृहाचा अवमान केला आहे, अशा गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यास संसदीय प्रथांचे अवमुल्यन होऊन सभागृहाच्या कामकाजाबाबत चुकीचा पायंडा पडेल. त्यांच्या बेशिस्त व अशोभनीय वर्तनाची गंभीर दखल घेत, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे सदस्यत्व पावसाळी अधिवेशनात पाच दिवसांसाठी निलंबित केल्याचा ठराव मांडला. तसेच निलंबनाच्या काळात विधानसभेच्या परिसरात त्यांना प्रवेश करण्यास बंदी घालण्याची मागणी केली.

दानवे यांच्या निलंबनाच्या ठरावाविरोधात विरोधकांनी चर्चेची मागणी लावून धरली. दरम्यान, उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी ठराव वाचून दाखवत असल्याचे सांगितले. मात्र, चर्चा करू देणार नसाल तर निदान दानवे यांना तरी त्यांच्या बाजू मांडण्याची संधी द्यावी, अशी मागणी विरोधकांनी केली. मात्र सभापतींनी मागणी फेटाळून लावत, निलंबनाच्या ठरावाचा प्रस्ताव आवाजी मतदानाने मंजूर केला. दानवे यांचे निलंबन झाल्याने त्यांना बोलता येणार नाही, अशी भूमिका उपसभापतींनी मांडली. त्यामुळे संतापलेल्या विरोधकांनी वेलमध्ये येऊन सभापती हायहाय, न्याय द्या, बहुमताच्या जोरावर निर्णय घेणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, अशा घोषणा देत विरोधकांनी सभात्याग करत दिवसभरासाठी कामकाजावर बहिष्कार घातला.

# माऊली सासवडला मुक्कामी

**सासवड :** आम्हा ध्यास पंढरीचा अपार.. अवघड वाटही होते लीलया पार..! विठ्ठलाच्या नामाचा अखंड जयघोष करीत व भक्तीचे भारावलेपण घेऊन पंढरीच्या वाटेवर असलेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहळ्याने लाखो वैष्णवांचा साथीने ज्येष्ठ कृष्ण योगिनी एकादशी मंगळवारी दिवे घाटातील वारीच्या वाटेवरील सर्वात कठीण नागमोडी वळणाचा टप्पा पार केला. सुमारे दोन तास घाटातील वाटचाल पूर्ण करून सोहळा संध्याकाळी सासवड मुक्कामी दाखल झाला.



डोक्यावर तुळशी वृंदावन, खांद्यावर भगव्या पताका, गळ्यात टाळ, मृदुंग, मुखाने ज्ञानोबा तुकाराम च्या नावाचा जयघोष करीत घाट पार करीत होते. त्यात वरुणराजाने चांगलीच भर घातली. सायंकाळी साडेचार वाजतासंत ज्ञानेश्वर पालखीसोहळ्याचे वैष्णवासमवेत दिवेघाटातून पुरंदर तालुक्यात आगमन झाले. माऊलींच्या दर्शनासाठी आसुसलेल्या लाखो भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाट आणि पुष्पवृष्टी करीत आनंद व्यक्त करीत मोठ्या उत्साहात पालखी सोहळ्याचे स्वागत केले.माउलींचा पालखी सोहळा पुण्यातून मार्गस्थ झाल्यानंतर दुपारी २ वा. वडकीनाला येथे विसाव्यासाठी थांबला. यावेळी वडकी ग्रामपंचायत व अनेक सार्वजनिक मंडळांनी अन्नदान केले. त्यानंतर दुपारी ३.३० वा. सर्वात अवघड टप्पा समजल्या जाणाऱ्या दिवेघाटातील वाटेने माऊलींच्या रथाचा प्रवास सुरू झाला. रथाला पाच बैलजोड्या जुंपण्यात आल्या होत्या. वातावरण ढगाळ स्वरूपाचे,जोरदार वाहता वारा व हवेत काहीसा थंडावा असल्याने उन्हाचा त्रास झाला नाही. मोठ्या अंतराचा हा टप्पा चढताना न थकता दिंडीतील वारकरी निरनिराळी पदे, अभंग, भारुडे,गौळणी म्हणताना दिसत होते. वारकऱ्यांमध्ये एक वेगळेच चैतन्य संचारले होते.संत ज्ञानेश्वर पालखीतळावर पादुकांचे आगमन झाल्यावर सामुहिक आरती होवून दोन दिवसांच्या मुक्कामासाठी माऊलींचा सोहळा विसावला.

पालखी सोहळ्यापुर्वीच पाऊस झाल्याने बळीराजा समाधानीदरवर्षी संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा पुरंदरला आला कि, पाऊस येतो अशी शेतकऱ्यांची भावना आहे. त्यामुळे सोहळ्याच्या आगमनाकडे सर्वांचे लक्ष लागलेले असते. मात्र अनेक वर्षे हि परंपरा खंडित झाली होती. पालखी सोहळा येवून अनेक वेळा कोरडाच गेल्याने यंदा काय होते ? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते. मात्र यंदा वेळेवर पाऊस झाला तसेच माउलीचे आज आगमन होत असतानाच सकाळी वरुणराजाने हजेरी लावली. आणि दिवसभर थोड्या फार प्रमाणात उपस्थिती दाखविल्याने पुरंदरचा शेतकरी यंदा समाधानी असल्याचे पाहायला मिळाले.

## साहेब, तुमचा शब्द खरा ठरवला, उबाठा तीन नंबरवर गेले, दराडेंचा मुख्यमंत्री शिंदेंना फोन

**नाशिक :** संपूर्ण राज्याचं लक्ष लागलेल्या विधान परिषदेवरील नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीत महायुतीचे (एकनाथ शिंदे यांची शिवसेना) उमेदवार किशोर दराडे यांनी बाजी मारली. विजयी झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी दराडेंनी फोनवरुन बातचित केली. साहेब तुमचा शब्द खरा ठरवला, ठाकरे तिसऱ्या क्रमांकावर गेले अशी प्रतिक्रिया दराडेंनी व्यक्त केली. विजयाचा गुलाल उधळणाऱ्या दराडेंचे कुटुंबीयही भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.

साहेब तुमचा शब्द खरा ठरवला, उबाठा तीन नंबरवर गेले. महाविकास आघाडीचा दारुण पराभव करुन मी मोठ्या मताधिक्याने विजयी झालो, अशी प्रतिक्रिया किशोर दराडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी फोनवर बोलताना दिली. किशोर दराडे यांना तपशीलवार मतमोजणी अंती २६ हजार ४७६ मते मिळाली होती. जिंकून येण्यासाठी ३१ हजार ५७६ इतक्या मतांचा निश्चित केलेला कोटा १९ व्या वगळणीफेरी अखेर पूर्ण करून दराडेंनी सर्वाधिक पसंतीक्रमाची ३२ हजार ३०९ मतं मिळवली. महाविकास आघाडीचे संदीप गुळवे आणि अपक्ष उमेदवार विवेक कोल्हे यांचा पराभव करत नाशिक शिक्षक मतदार संघातून सलग दुसऱ्यांदा ते विजय झाले आहे. याबाबतची अधिकृत घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी केली आहे. कोटा निश्चित झाल्यानंतर बाद फेऱ्यांची मतमोजणी सुरू झाली. यामध्ये १९ व्या बाद फेरीनंतर मविआचे संदीप गुळवे हे बाद झाले असून अंतिम लढत किशोर दराडे व विवेक कोल्हे या दोन उमेदवारामध्ये झाली. यामध्ये जिंकून येण्यासाठी ३१ हजार ५७६ इतक्या मतांचा कोटा निश्चित केला होता. १९ व्या फेरी अखेर बाद झालेल्या उमेदवारांची मते पसंती क्रमानुसार संबंधित उमेदवारांना देण्यात आली. दराडे यांनी कोटा पूर्ण करून सर्वाधिक पसंतीक्रमाची ५ हजार ६० मते मिळवून विजयी झाले. विवेक कोल्हे यांना तिसरा फेरी अखेर १७ हजार ३९३ मते पडली असून सर्वाधिक पसंती क्रमाची ६ हजार ७२ मते पडली.

# जूनने केला हिरमोड, आता जुलैकडून आशा, राज्यात मुसळधार

**मुंबई :** देशभरात जूनमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस पडल्यानंतर आता जुलै महिन्यावर आशा केंद्रित झाल्या आहेत. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार जुलैमध्ये देशभरात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडू शकेल. दीर्घकालीन सरासरीपेक्षा १०६ टक्क्यांपेक्षा हा पाऊस अधिक असू शकेल. ईशान्य भारत, वायव्य भारताचा काही भाग; तसेच पूर्व भारत आणि दक्षिण भारताचा काही भाग येथे सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज आहे. महाराष्ट्रात विदर्भ आणि मराठवाड्याचा काही भाग वगळता उर्वरित महाराष्ट्रातही सरासरीपेक्षा अधिक पाऊस असेल अशी शक्यता आहे.

देशभरात सरासरीपेक्षा अधिक होणाऱ्या पावसामुळे शेती, धरणक्षेत्राला दिलासा मिळू शकेल, असे भारतीय हवामान विभागाने स्पष्ट केले आहे; मात्र या अतिरिक्त पावसामुळे पूरस्थिती, दरडी कोसळण्यासारख्या घटनाही घडू शकतात याकडेही लक्ष वेधण्यात आले आहे.

जुलैमध्ये देशभरात सरासरी २८०.४ मिलिमीटर पाऊस पडतो. महाराष्ट्रातील धरणक्षेत्राला पावसाची प्रतीक्षा आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, राज्याच्या बहुतांश भागांत सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडू शकेल.

दक्षिण कोकणात हा जोर अधिक असू शकेल. जुलैमध्ये किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त अशू शकेल, तर पश्चिम किनारपट्टी आणि मध्य भारताचा बहुतांश भाग येथे कमाल तापमान सरासरीपेक्षा जास्त असेल. महाराष्ट्रामध्ये उत्तर कोकणामध्ये कमाल तापमानात जुलैमध्येही तापदायक ठरू शकेल, अशी शक्यता जुलैच्या पूर्वानुमानावरून वर्तवण्यात आली आहे. यंदाच्या जूनमधील देशातील पावसाची आकडेवारी पाहता १९०१ पासूनचा हा ३२व्या क्रमांकाचा कमी पावसाचा महिना होता. तर २००१नंतरच्या कालावधीत कमी पर्जन्यमान होण्याच्या क्रमवारीत यंदाच्या जूनचा सातवा क्रमांक होता.

सन २००९मध्ये ८७.५, २०१४मध्ये ९२.१, २०१९मध्ये ११३.६ मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला आहे.

सन १९५०पासूनची आकडेवारी पाहता २०१९पर्यंत २५ वर्षे जूनमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. यापैकी २० वर्षांमध्ये जूनमधील पाऊस कमी झाल्यानंतरही जुलैमधील पाऊस सरासरीइतका किंवा सरासरीहून अधिक होता, अशी माहिती भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय मोहपात्रा यांनी दिली. त्यामुळे जुलैमध्ये सरासरी किंवा त्याहून अधिक पावसाची शक्यता ८० टक्के असल्याचा सांख्यिकी अंदाजही त्यांनी व्यक्त केला.

## फडणवीसांच्या नागपूरात कत्तलखान्याचा विरोधात हजारो लोक रस्त्यावर

**नागपूर :** उमरेड तालुक्यातील सुरगाव ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्व्हे क्रमांक १९३ येथे एमएमआरडीएने १ हेक्टर जमिनीवर कत्तलखाना विकसित करण्यास सुरुवात केली आहे. या निर्णयामुळे स्थानिक नागरिक संतप्त झाले आहे. विविध हिंदू संघटना, राजकीय पक्ष आणि ग्रामपंचायतींच्या शिष्टमंडळांनी सोमवारी मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांनी पाचगाव येथे महामार्गावर भजन-कीर्तन करत जोरदार आंदोलन केले. यावेळी हजारो नागरिक आंदोलनात सहभागी झाले होते. या आंदोलनामुळे या मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

या कत्तलखान्यामुळे आजूबाजूची शेती उद्ध्वस्त होइल आणि परिसरात दुर्गंधी पसरेल. तसेच शेतकरी आणि पर्यावरणाचे नुकसान होईल. हे प्रकल्प जबरदस्ती या भागातील शेतकऱ्यांवर लादले जात आहे. सुरगाव, खापरी राजा, आनंदवन, चनोदा, नवेगाव, कळमना, दिपाळा, लांजाळा, उंडरी, डोंगरगाव, पाचगाव, चांपा, हळदगाव, मांगली, उटी, मतकाझरी, पेंढरी, सुकळी, सालाईमेंढा, वडद, वडेगाव तसेच इतर भागात धार्मिक व शैक्षणिक परिसर आहे. त्यामुळे सुरगाव ग्रामपंचायत खसरा क्रमांक १९३ क्षेत्रातील १६.२८ हेक्टरमधील १ हेक्टरमधील निवडलेला कत्तलखाना तातडीने रद्द करण्यात यावा, अशी मागणी एमएमआरडीएकडे आंदोलकांनी केली आहे, आणि त्याची कायमस्वरूपी चौकशी करण्यात यावी,अशी मागणी करत स्थानिक ग्रामपंचायत सरपंचांसह तालुका विश्व हिंदू परिषदेच्या शिष्टमंडळासह विविध हिंदू संघटना आणि राजकीय क्षेत्रातील नेत्यांना निवेदन सुद्धा देण्यात आले आहे.

## भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचा परदेशी विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम

**पुणे:** भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद (आयसीसीआर) चे पुणे उप-क्षेत्रीय कार्यालयातर्फे परदेशी विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.ज्या परदेशी विद्यार्थ्यांनी भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेकडून शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे आणि आता मायदेशी परत जात आहेत,अशा विद्यार्थ्यांना निमंत्रित करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे नाव एक्झिट-एंगेजमेंट-ईव्हनिंग (ई-३) असे आहे.हा कार्यक्रम दि.४ जुलै २०२४ रोजी संध्याकाळी साडेपाच वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृह येथे आयोजित केला आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या उपमहासंचालक श्रीमती अंजू रंजन(आयएफएस ) या उपस्थित राहतील , तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. पराग काळकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.



# भुशी धरण परिसरातील अतिक्रमण काढण्याची कारवाई सुरू

**मुंबई :** लोणावळ्यातील पर्यटकांची पंढरी समजल्या जाणाऱ्या भुशी धरण परिसरातील अतिक्रमण काढण्याची कारवाई सुरू झाली आहे. लोणावळा नगरपरिषद आणि पुणे रेल मंडळ प्रशासनाकडून संयुक्त अतिक्रमण कारवाई सुरू आहे. भुशी धरण परिसरात चहा, नाष्टा, फेरीवाले, कणीस विक्रेते यांनी दुकाने थाटली होती. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने कारवाईचा बडगा उचलला आहे.

भुशी डॅम रेल्वेच्या मालकीचे असल्याने, त्यांनी स्थानिक प्रशासनाची मदत घेतली आहे. वर्षविहारासाठी पर्यटक पावसाळ्यात भुशी धरण परिसराला पसंती देतात. मात्र या ठिकाणी अतिक्रमणामुळे मोठी दाटी झाली होती. दोन दीवसापूर्वी घडलेल्या दुर्घटनेनंतर प्रशासनाला जाग आली. याची गंभीर दखल घेऊन कारवाईला सुरुवात केली आहे. या कारवाईवेळी रेल्वे पोलीस दल आणि लोणावळा पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. लोणावळा भुशी डॅम परिसरात ३० जून रोजी रविवारी एक मोठी दुर्घटना घडली. भुशी डॅमच्या बॅकवॉटरमधील धबधब्यावर एकाच कुटुंबातील पाच जण वाहून गेले. पावसाळ्यात लोणावळ्यातील भुशी डॅम परिसर नेहमीच पर्यटकांनी फुलून गेलेला असतो. आठवड्यांच्या इतर दिवसांपेक्षा शनिवार-रविवार इथे जास्त गर्दी असते. भुशी डॅम परिसरात असणाऱ्या धबधब्यावर भिजण्याचा मनसोक्त आनंद घेण्यासाठी अन्सारी कुटुंब उतरलं होतं. यावेळी पाऊस कोसळत होता. अचानक धबधबा असलेल्या भागात पाण्याचा प्रवाह वाढला आणि अन्सारी कुटुंबातील पाच जण वाहून गेले. अन्सारी आणि सय्यद कुटुंब या ठिकाणी वर्षा सहलीचा आनंद घेण्यासाठी आले होते. या घटनेमुळे आनंद क्षणार्धात दुःखामध्ये बदलला. साहिस्ता लियाकत अन्सारी (३६), मिमा सलमान उर्फ आदिल अन्सारी (१३), उमेरा सलमान उर्फ आदिल अन्सारी (८), अदनान अन्सारी (४), मारिया अन्सारी (९) वाहून गेले. या दुर्घटनेनंतर प्रशासनला खडबडून जाग आली आहे. त्यांनी तातडीने पावल उचलली आहेत.

## जीविधा'च्या हिरवाई महोत्सवातील व्याख्याने ४ जुलैपासून

**पुणे :** पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत 'जीविधा' संस्थेचा 'हिरवाई महोत्सव' दि. ४ ते ७ जुलै दरम्यान भावे प्राथमिक शाळेचा नवीन हॉल(सदाशिव पेठ) येथे आयोजित करण्यात आला असून वनस्पती,प्राणी,हिरवाई आणि पर्यावरण रक्षणाची चर्चा करणारी व्याख्याने, जनजागृती असे या महोत्सवाचे स्वरूप आहे.'जीविधा'संस्थेचे संस्थापक राजीव पंडित यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.स्थानिक देशी वनस्पतींच्या लागवडीत लोकांचा सहभाग वाढावा यासाठी दरवर्षी 'हिरवाई महोत्सव'आयोजित करते.या उपक्रमाचे यंदाचे १६ वे वर्ष आहे.

दि. ४ ते ७ जुलै दरम्यान सायंकाळी ६.३० ते ८ या वेळेत व्याख्याने होणार आहेत.दि.४ जुलै रोजी उपक्रमाचे उद्घाटनपर व्याख्यान 'वनस्पतींच्या नांवाभोवतीच्या कथा' हे असून डॉ मंदार दातार या विषयावर बोलणार आहेत. ५ जुलै रोजी लेखिका मृणालिनी वनारसे यांच्या 'सोनवारा - अर्थात बागेतल्या रानव्याची गोष्ट ' या कादंबरीचे वाचन होणार आहे.६ जुलै रोजी 'उत्क्रांतीच्या पाऊलखुणा - पाषाणातील वनस्पती जीवाश्म' या विषयावर प्रा. प्र. के. घाणेकर बोलणार आहेत.७ जुलै रोजी जीविधा संस्थेचा वर्धानपनदिन साजरा केला जाणार आहे. त्या अंतर्गत 'पुणे विल्डरनेस' या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे.राजीव पंडित व अनुज खरे यांनी हे पुस्तक संपादित केले आहे. न्या.श्रीराम मोडक ( मुंबई उच्च न्यायालय) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.यानिमित्ताने अनुज खरे व राजीव पंडित यांच्या जंगलातील अनुभवांवर आधारीत मुलाखतीचा कार्यक्रम होणार असून डॉ.महेश शिंदीकर त्यांच्याशी संवाद साधतील.

वनस्पती व पर्यावरण शास्त्र (इकॉलॉजी) विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन

हिरवाई महोत्सवाच्या निमित्ताने दि.१ ते ३ जुलै दरम्यान वनस्पती व पर्यावरण शास्त्र (इकॉलॉजी) विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन जीविधाच्या कर्वे रस्त्यावरील कलमाडी हाऊस नजीकच्या कार्यालयात सुरु झाले आहे.तज्ज्ञ व अभ्यासकांनी लहान मुले व प्रौढांसाठी लिहीलेली इंग्रजी व मराठीतील पुस्तके यात पहायला मिळतील.दि.४ ते ६ जुलै भावे प्राथमिक शाळेच्या नवीन हॉल(सदाशिव पेठ, टिळक स्मारक मंदिर समोरील गल्ली) येथे सायंकाळी ६.३० ते ८ यावेळात व्याख्याने आयोजित केली आहेत. महोत्सवातील सगळे कार्यक्रम सर्वासाठी मोफत खुले आहेत.

## कोणाचे पाय चाटून राजकरण करायचे नाही, स्वबळावर लढू

**वाशिम :** भाजपने विधान परिषदेच्या पाच उमेदवारांची यादी जाहीर केली असून यामध्ये रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष सदाभाऊ खोत यांचं सुद्धा नाव आहे. यावरून कुणाचे पाय चाटून आम्हाला राजकारण करायचं नाही असा टोला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी सदाभाऊ खोत यांना लगावला आहे. कोणाला उमेदवारी दिली आणि कोणाला नाही दिली याच्याशी आम्हाला काही देणघेण नाही असे म्हणत आम्ही आमचं काम करत आहोत. त्यामुळं कुणाचे पाय चाटून आम्हाला राजकारण करायचं नाही असा टोला लगावत राजु शेट्टी यांनी अप्रत्यक्षरित्या खोतांवर टीका केलीय. आम्ही आमच्या मेहनतीवर लढून राजकारण करतोय म्हणून आम्ही स्वबळावर लढलो आणि लढणार आहोत असे मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी बोलताना व्यक्त केले आहे. आज वाशिम जिल्ह्यातील वसारी येथे राजु शेट्टी सभेसाठी आले असता त्यांनी माध्यमांना ही प्रतिक्रिया दिली आहे.

हरित क्रांतीच्या माध्यमातून देशाला अन्नधान्यात समृद्ध करणाऱ्या दिवंगत वसंतराव नाईक यांच्याच राज्यात शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या होणं हे देशासाठी लांच्छनास्पद असून सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची वेळ आलीये असा आरोप शेट्टींनी केला, म्हणून सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा अशी मागणी राजू शेट्टी यांनी केली आहे. यासाठी त्यांनी वाशिम जिल्ह्यातून दिवंगत वसंतराव नाईक यांच्या नावाने कर्जमुक्ती आंदोलनाची घोषणा केलीये या आंदोलना अंतर्गत पहिल्या टप्प्यात सर्व शेतकऱ्यांचे निवेदन घेऊन राष्ट्रपतींना दिले जाणार आहेत. तर दुसऱ्या टप्प्यांमध्ये मंत्र्यांना गावबंदी केली जाईल असेही राजू शेट्टी यावेळी म्हणाले आहेत.

## तुला पगार कोण देतो? ड्युटीवर?; मंत्र्याच्या पत्नीने पोलीस अधिकाऱ्याला झापले

**मुंबई :** मागच्या महिन्यात देशात लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. केंद्रात पुन्हा एकदा मोदी सरकार स्थापन झालय. त्याचवेळी काही राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचे निकालही लागले. केंद्रात मोदी सरकारने सत्ता टिकवली पण आंध्र प्रदेशात मात्र सत्ता बदल झाला. तिथे जगनमोहन रेड्डी यांचं सरकार जाऊन चंद्राबाबू नायडू पुन्हा सत्तेवर आले. आता चंद्राबाबू नायडू सरकारमधील एका मंत्र्याच्या पत्नीमुळे वाद निर्माण झाला आहे. मंत्री मंडीपाल्ली रामाप्रसाद यांच्या पत्नीच्या कृतीमुळे हा वाद निर्माण झालाय. सोशल मीडियावर या प्रसंगाचा व्हिडिओ व्हायरल होतोय. एका कार्यक्रमाला जाताना पोलीस अधिकाऱ्यामुळे थांबून रहाव लागल्याने या मंत्र्याच्या पत्नीने त्या अधिकाऱ्याला झापलं. मूळात तिला तो अधिकारच नाहीय.

अन्नामय्या जिल्ह्यात ही घटना घडली. हरीता रेड्डी एका स्थानिक कार्यक्रमासाठी चालल्या होत्या. कारच्या पुढच्या सीटवर त्या बसल्या होत्या. रमेश नावाच्या पोलीस इंस्पेक्टरला त्या झापत असल्याच व्हिडिओमध्ये दिसतय. या पोलीस इंस्पेक्टरमुळे अर्धातास थांबून रहाव लागलं, असं हरीता रेड्डी यांचा दावा आहे. तिने त्या इंस्पेक्टरला अनेक प्रश्न विचारले. त्याच्या वर्तनावर संताप, असमाधान व्यक्त केलं.

सकाळ झाली नाही का? कुठली परिषद होती तुझी? लग्नाला आलायस की, ड्युटीवर? तुझ्यासाठी अर्धातास थांबून रहाव लागलं. तुला पगार कोण देतो? सरकार की, धडठझ? अशा शब्दात मंत्र्यांच्या पत्नीने त्या पोलीस इंस्पेक्टरला झापलं. तो शांतपणे तिथे उभ राहून हे सर्व ऐकत होता. व्हिडिओच्या शेवटी तो इंस्पेक्टर हरीता रेड्डीला सॅल्यूट करतो. तिच्या निर्देशानुसार ताफ्याच नेतृत्व करण्यासाठी पुढे निघून जातो.

कायदेशीर बाबी सांभाळण्याचं काम ते करतात. राजेश विटेकरांनी २०१९ मध्ये राष्ट्रवादीकडून लोकसभा निवडणूक लढवली. त्यात ते पराभूत झाले. २०२४ मध्येही ते लोकसभा लढण्यास उत्सुक होते. परभणीची जागा राष्ट्रवादीला मिळाली असल्यानं त्यांच्या आशा उंचावल्या. पण भाजपच्या आग्रहावरुन राष्ट्रवादीच्या कोट्यातील परभणीची जागा रासपचे अध्यक्ष महादेव जानकरांना देण्यात आली. जानकरांचा सव्वा लाख मतांनी पराभव झाला. लोकसभेची संधी हुकलेल्या विटेकरांना आता अजित पवारांनी परिषदेवर संधी दिली आहे. अजित पवारांनी या आमदारकीच्या माध्यमातून विटेकरांना दिलेला शब्द पाळला आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# लाडकी बहिण योजनेत महत्वाचे ७ मोठे बदल

**मुंबई** : अर्थसंकल्पात अर्थमंत्री अजित पवार यांनी घोषणा केलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थी नोंदणीला १ जुलैपासून सुरुवात झाली. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक तालुक्यात महिलांनी प्रचंड गर्दी केली. यातील अटीशर्थीवरुन विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभा अधिवेशनात बोलताना काही नियम शिथिल झाल्याचं सांगितलं. वयाची मर्यादा वाढ करण्यात आली आहे, त्याशिवाय उत्पन्नाची अटही शिथिल करण्यात आली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अंतरिम अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली. या योजनेतंर्गत महिलांना शासनामार्फत दरमहा दीड हजार रुपये दिले जाणार आहेत. तसेच, यासाठी पात्र अपात्रतेचे निकष लावण्यात आले आहेत. मुख्यमंत्री माझी लालकी बहीण योजनेत सात बदल करण्यात आले आहेत. पाहूयात काय बदल करण्यात आले आहे...

१. सदर योजनेत अर्ज करण्याची मुदत दि.१जुलै, २०२४ ते १५ जुलै, २०२४ पर्यंत ठेवण्यात आली होती. या मर्यादेत सुधारणा करण्यात येत असून आता सदर मुदत २ महिने ठेवण्यात येत असून ती दि.३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत लाभार्थी महिलांना अर्ज करता येईल. तसेच दि.३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत अर्ज करण्यात आलेल्या



लाभार्थी महिलांना दि.०१जुलै, २०२४ पासून दर माह रु.१५००/- आर्थिक लाभ देण्यात येणार आहे.

२. या योजनेच्या पात्रतेमध्ये आधिवास प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले होते. आता लाभार्थी महिलेकडे आधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्या ऐवजी १५ वर्षापूर्वीचे १. रेशन कार्ड २. मतदार ओळखपत्र ३. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र ४. जन्म दाखला. या चारपैकी कोणतेही ओळखपत्र/प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार आहेत.

३. सदर योजनेतून ५ एकर शेतीची अट वगळण्यात आली आहे.

४. सदर योजनेत लाभार्थी महिलांचा वयोगट २१ ते ६० वर्ष वयोगट ऐवजी २१ ते ६५ वर्ष वयोगट करण्यात येत आहे.

५. परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील आधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल तर अशा बाबतीत त्यांच्या पतीचे १. जन्म दाखला २. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र ३. आधिवास प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

६. रु.२.५ लक्ष उत्पन्न दाखला उपलब्ध नसेल तर ज्या कुटुंबाकडे पिवळे व केशरी रेशनकार्ड उपलब्ध असेल त्यांना उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सुट देण्यात येत आहे.

७. सदर योजनेत कुटुंबातील एका पात्र अविवाहित महिलेला सुध्दा या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज कसा करायचा?

योजनेच्या लाभासाठी पोर्टल/मोबाईल ॲपद्वारे, सेतू सुविधा केंद्राद्वारे अर्ज करता येईल.

**लाभार्थ्यांचं आधार कार्ड**
**महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र/महाराष्ट्र राज्यातील जन्मदाखला**
**सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला कुटंबप्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न २.५० लाखापर्यंत असणं अनिवार्क (५) बँक खातं**
**पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स कॉपी)**
**पासपोर्ट आकाराचा फोटो**
**रेशनकार्ड**
**सदर योजनेच्या अटी-शर्तीचे पालन करण्याबाबतचं हमीपत्र**



## वाहनधारक समन्वयक समिती आक्रमक

### दाभोळकर चौकात जेलभरो आंदोलन

**कोल्हापूर :** रिक्षा, टॅक्सी तसेच इतर वाहनांना विलंब आकार दररोज ५० रुपये इतका आकारला जातोय. हा विलंब आकार रद्द करा या मागणीसाठी आज कोल्हापूर जिल्हा रिक्षा व टॅक्सी वाहनधारक समन्वयक समितीने शासनाचं लक्ष वेधण्यासाठी दाभोळकर चौकात रास्ता रोको करून जेलभरो आंदोलन केलं. यावेळी मोठी वाहतूक कोंडी झाली होती.

रिक्षा चालकांना असंघटित कामगार घोषित त्यांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ देण्यात यावा. रिक्षा व टॅक्सी चालक आरटीओ कार्यालयात आल्यानंतर त्यांना एक तासाच्या आत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात त्याचप्रमाणे रिक्षा पासिंग करता एक खिडकी योजना सुरू करावी यासह अन्य मागण्यासाठी सदरचे जेलभरो आंदोलन करण्यात आले यावेळी शासनाच्या निषेधार्थ जोरदार घोषणा देण्यात आल्या. जोपर्यंत शासन विलंब शुल्क रद्द करत नाही, तोपर्यंत आमची आंदोलने सुरूच राहणार, असा इशारा वाहनधारक समन्वयक समितीने दिला. आंदोलनादरम्यान प्रचंड पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

या जेलभरो आंदोलनात कॉम्रेड सतीशचंद्र कांबळे, शिवसेनेचे विजय देवणे, संजय पवार, चंद्रकांत भोसले, राजू जाधव, अविनाश दिंडे, दिलदार मुजावर,अतुल पवार, राहुल पवार, ईश्वर चन्नी, रेहान मुजावर, विठ्ठल जानकर, विजय जेधे, सागर ओतारी, भास्कर भोसले, मिलिंद सुतार,अरुण घोरपडे, शिवाजी पाटील, पोपट रेडेकर, संजय पाटील, महेश वासुदेव, संभाजी माने, निखिल पवार, ज्ञानेश्वर व्हटकर यांच्यासह वाहनधारक समन्वयक समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## चांदोली धरणात गतवर्षीपेक्षा एक टीएमसीने जादा पाणीसाठा

**शिराळा** : चांदोली (ता. शिराळा) धरण पाणलोट क्षेत्रात पावसाने गेले चार दिवसात दमदार हजेरी लावली आहे. यामुळे गतवर्षीपेक्षा एक टीएमसी पाणीसाठा जास्त झाला आहे. धरणात एकूण ११.९२ टीएमसी तर ५.०४ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. गतवर्षी जूनअखेर एकूण पाणीसाठा १०.८८ टीएमसी होता. गतवर्षी पेक्षा ३६८ मिलिमीटर पाऊसही जादा पडला आहे.



धरणातून ६७५ क्यूसेकने पाणी नदीपात्रात सोडण्यात येत आहे. पाणलोट क्षेत्रात पावसाची चांगली हजेरी लागल्याने ४५८९ क्यूसेकने पाण्याची आवक सुरू झाली आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठ्यात वाढ होत आहे. गेल्या चोवीस तासात पाथरपुंज येथे ५२, निवळे येथे ७७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. पाथरपुंज येथे आजअखेर १ हजार १८८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

गतवर्षी कमी पाऊस पडल्याने नोव्हेंबर महिन्यापासून या धरणातून मागणीनुसार नदीपात्रात व कालव्यामध्ये पाणी सोडण्यात येत होते. रविवारी तालुक्यात लहान मोठ्या सरी पडल्या. यामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. चांदोली धरण परिसरात १ जून पासून ५१६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

पाथरपुंज, निवळे, धनगरवाडा, चांदोली धरण परिसर या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस होत आहे. धरणामध्ये पाण्याची ४५८९ क्यूसेकने आवक सुरू झाली आहे. त्यामुळे पाणीसाठ्यात वाढ होत आहे. गतवर्षी ३० जूनअखेर १४८ मिलिमीटर तर यावर्षी ५१६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

सोमवारी सकाळपासून या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कमी झाला आहे. दुपारी ४ पर्यंत पाथरपुंज येथे ११ मिमी, निवळे येथे २२ मिमी, चांदोली धरण परिसरात ६ मिमी, धनगरवाडा येथे ११ मिमी पावसाची नोंद झाली आहे. दुपारनंतर पावसाने उघडीप दिली आहे.

**चांदोली धरण पाणलोट क्षेत्रात सोमवारी सकाळी ७ पर्यंत पडलेला पाऊस (कंसात एकूण पाऊस मिलिमीटरमध्ये)**

**चांदोली धरण** : ५३ (५१६)
**पाथरपुंज** : ५२ (११८८)
**निवळे** : ७७ (९७९)
**धनगरवाडा** : ४६ (५१३)

**शिराळा तालुक्यातील मंडलनिहाय पाऊस (मिलिमीटरमध्ये)**

**कोकरूड** : ७.३० (१४६.१०)
**शिराळा** : ५.३० (१५३.१०)
**शिरशी** : ११.८० (२७३.३०)
**मांगले** : ११.३० (२०६.९०)
**सागाव** : १०.५० (१५०.२०)
**चरण** : ३९ (३७१.७०)

## महायुती सरकारच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचवणार : धैर्यशील कदम

**सातारा** : महिला, शेतकरी, युवक, दुर्बल घटकाला समर्पित अर्थसंकल्प गरीब, महिला, शेतकरी आणि युवा वर्गाची प्रगती साधणारा अर्थसंकल्प राज्यातील महायुती सरकारने मंजूर केलेला आहे. या अर्थसंकल्पातील जाहीर झालेल्या योजना तळागाणापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार आहे, अशी माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कदम म्हणाले, शेतकर्यांना समस्यामुक्तीसाठी भरघोस मदतीची हमी देतानाच सौरउर्जा पंप देण्याची महायुती सरकारची घोषणा राज्याच्या कृषी क्षेत्रास संजीवनी देणारी ठरणार आहे. राज्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून महायुती सरकार राबवत असलेल्या मोहिमेस वेग येणार असून नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या ६१ प्रकल्पांमुळे येत्या दोन वर्षांतच सिंचनाखालील क्षेत्रात साडेतील लाख हेक्टरहून अधिक शेतजमिनीची भर पडणार आहे. युवक, महिला, दुर्बल घटक, उपेक्षित, आदिवासी, बेरोजगार, विद्यार्थी, श्रमजीवी, कामगार, नोकरदार, अशा सर्व घटकांच्या जीवनशैलीत थेट सुधारणा घडवून आणणार्या अनेक योजना सरकारने जाहीर केल्या असून शिक्षण, आरोग्य, उद्योग, पायाभूत सुविधा, अशा अनेक क्षेत्रांत विकासाचे नवे वारे वाहणार आहेत. वर्षाला घरटी तीन गॅस सिलेंडर मोफत देण्यात येणार आहेत. गरीब कुटुंबातील महिला आणि तरुणींना प्रत्येक महिन्याला १५०० रुपये देणारी माझी लाडकी बहिण या योजनेमुळे महिलांना आर्थिक पाठबळ लाभणार आहे. आता वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमीती विकास महामंडळाअंतर्गत राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ व पैलवान कै. मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करून सरकारने समाजाच्या प्रत्येक घटकाच्या विकासाच्या संकल्पपूर्तीचे पुढचे पाऊल टाकले आहे.

दरम्यान, जनतेला या योजनांचा लाभ व्हावा, यासाठी भाजपतर्फे यंत्रणा कामाला लावण्यात आली असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा रेणू येळगावकर, प्रदेश कार्यकारिणी सदस्या सुवर्णाताई पाटील, प्रदेश चिटणीस सुनीशा शहा, जिल्हा सरचिटणीस विठ्ठल बलशेटवार, वाई ग्रामीण अध्यक्ष दीपक ननावरे, जिल्हा उपाध्यक्ष राहुल शिवनामे, शहराध्यक्ष विकास गोसावी, शहराध्यक्षा महिला मोर्चा रिना भणगे, महिला मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीस वैष्णवी कदम, वैष्णवी टंगसाळे यांची उपस्थिती होती.

## क्रीडा नैपुण्य निवड चाचण्या सुरू करण्याची मागणी

**खंडाळा :** महाराष्ट्र राज्यातील क्रीडा प्रबोधिनी अंतर्गत ८ ते १४ वयोगटातील मुलामुलींच्या क्रीडा नैपुण्य निवड चाचण्या पुर्वी प्रमाणे घेऊन ग्रामीण भागातील भावी क्रीडापटूंना राज्य सरकारने न्याय द्यावा.अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक शारीरिक शिक्षण संघटनेने केली आहे.

महाराष्ट्रात क्रीडा क्षेत्राचा दर्जा उंचावण्यासाठी तसेच राज्यातून जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खेळाडू तयार व्हावे या उद्देशाने पुणे येथे शिवछत्रपती क्रीडापीठ अंतर्गत राज्यात अनेक ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी सुरू आहेत.

या क्रीडा प्रबोधिनी मध्ये ८ ते १४ वयोगटातील मुला मुलींची भारतीय क्रीडा प्राधिकरणाने पुरस्कृत केलेल्या निवड चाचण्यांद्वारे (क्रीडा नैपुण्य चाचण्या) प्रशिक्षणार्थींची निवड करून त्यांना तज्ञ क्रीडा प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाद्वारे विविध खेळाचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण दिले जाते. या क्रीडा प्रबोधिनीत सर्वसामान्य कुटुंबातून निवड झालेले अनेक विद्यार्थी राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली कामगिरी बजावत आहेत.

सातारा जिल्ह्यातील टोकियो ऑलिंपिक २०२०-२०२१ खेळलेले व पॅरिस ऑलिंपिक २०२४ साठी पात्र झालेले आर्चर प्रवीण जाधव, भारतीय महिला हॉकी संघातील खेळाडू वैष्णवी फाळके, अक्षदा ढेकळे, ऋतुजा पिसाळ, काजल आटपाडकर, अश्विनी कोळेकर, बाळासाहेब भिसे (ता. माण) यासारखे अनेक खेळाडू हे क्रीडा नैपुण्य चाचणीद्वारेच निवड झालेले होते व ते आज राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखवत आहेत.

परंतु गेली काही वर्षापासून शिवछत्रपती क्रीडापीठ अंतर्गत ८ ते १४ वयोगटातील मुलामुलींची क्रीडा नैपुण्य चाचण्यांद्वारे होणारी निवड पूर्णपणे बंद करण्यात आलेली आहे. उपसंचालक क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य यांच्या २५ जून २०२४ च्या परिपत्रकानुसार सरळ प्रवेश व खेळातील कौशल्य चाचणी यानुसारच प्रबोधिनी मध्ये खेळाडूंची निवड होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील ८ ते १४ वयोगटातील सर्वसामान्य ग्रामीण भागातील गोरगरीब कुटुंबातील मुलामुलींना क्रीडा क्षेत्रांमध्ये आपली क्षमता सिद्ध करण्याचे मार्ग बंद झाले आहेत.

## शासनाच्या लाडकी बहिण योजनेच्या अंमलबजावणीसाठी पाटण महसूल प्रशासनाची युद्ध पातळीवर तयारी सुरू...





**पाटण तहसीलदार कार्यालय परिसरात महिलांची गर्दी**

**पाटण** :- महाराष्ट्र शासनाकडून राज्यातील महिला वर्गासाठी नुकतीच मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण ह्या योजनेची घोषणा करण्यात आली असून प्रशासकीय पातळीवर याबतचा शासन निर्णय देखील निर्गमित झाला आहे.

२.५० लाखापेक्षा कमी उत्पन्न गटातील २१ ते ६० वयोगटातील महिलांसाठी हो योजना असून ह्या योजनेत अशा महिलांना दरमहा १५०० रू मिळणार आहेत. ह्या योजनेसाठी विवाहित ,विधवा घटस्फोटित,परितक्त्या व निराधार महिला पात्र ठरणार असून यासाठी अर्ज करण्याची मुदत १जुलै ते १५ जुलै अशी असणार आहे

यासाठी उत्पन्नाचा दाखला,आधार कार्ड रेशन कार्ड,रहिवासी दाखला ,बँक पासबुक आदी कागदपत्राची आवश्यकता लागणार असून अशा पात्र महिलांचे अर्ज महा ई सेवा केंद्र आपले सरकार केंद्र,अंगणवाडी सेविका ,ग्रामपंचायत कार्यालय,ग्रामसेवक यांचे मार्फत स्वीकारले जाणार आहे.

पाटण तालुक्यात ह्या योजनेसाठी पात्र ठरणाऱ्या सर्व महिलांना ह्याचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी स्थानिक महसुल प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. त्यामुळे तहसीलदार अनंत गुरव व प्रांताधिकारी सुनील गाढे यांनी महा ई सेवा केंद्र चालक ,आपले सरकार केंद्र चालक तलाठी ,मंडळ अधिकारी यांची बैठक घेऊन आवश्यक ते नियोजन करत आहेत. याकरिता रात्री उशिरा पर्यंत बसून या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी साठी महसूल प्रशासनाने कंबर कसल्याचे दिसून येत आहे. जिल्हास्तरावर देखील याबाबत नियोजन सुरू असून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

आज आठवड्याचा पहिलाच दिवस असल्याने पाटण मध्ये कागदपत्र प्राप्त करण्यासाठी तसेच योजनेची माहिती घेण्यासाठी महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याचे चित्र दिसून येत होते.

या योजनेमुळे पाटण सारख्या दुर्गम भागातील गरीब कुटुंबातील महिलांना आर्थिक उत्पंनाचे कुठलेही खात्रीशीर साधन नसल्याने दरमहा १५०० रू मिळणार असल्याने त्यांना निश्चितपणे दिलासा मिळणार आहे.त्यामुळे या योजनेमुळे ग्रामीण भागातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील व इतर कोणत्याही योजनेचा लाभ न मिळणाऱ्या महिलांच्या अपेक्षा या योजनेमुळे निश्चितपणे उंचावल्या असल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे.

**पाटण मध्ये सध्या १८ वर्षांवरील एकूण ३ लक्ष मतदार असून त्यापैकी सुमारे १.५० लक्ष महिला मतदार आहेत .२१ ते ६० हा वयोगट लक्षात घेतल्यास पाटण मध्ये जास्तीत जास्त महिलांना या योजनेचा लाभ देणे शक्य असून तो देण्याचा दृष्टीने आम्ही नियोजन केले असून एकही पात्र लाभार्थी यापासून वंचित राहणार नाही यासाठी पुढील काही दिवस वेळ पडली तर २४ तास प्रयत्नाची शिकस्त करू**

**सुनील गाढे प्रांताधिकारी, पाटण.**



## भीमाशंकर येथील धबधबे पर्यटकांसाठी बंद

**पुणे** : भीमाशंकर देवस्थान दर्शन आणि वर्षा पर्यटनासाठी भीमाशंकर वन्यजीव अभयारण्यात येणाऱ्या पर्यटकांना अपघात प्रवण क्षेत्रात येत्या ३० सप्टेंबरपर्यंत प्रवेश बंद करण्यात आला आहे. पर्यटकांनी वर्षासहलींसाठी या भागात येऊ नये, नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असे आदेश वन विभागाने (वन्यजीव) प्रसिद्धीपत्रकाद्वारे काढले आहेत.

भीमाशंकर परिसरात वर्षभर देवस्थानात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी असते, पावसाळ्यात पर्यटकही मोठ्या संख्येने निसर्गरम्य परिसरात फिरण्यासाठी, धबधब्याचा आनंद घेण्यासाठी येतात. 'वनपरिक्षेत्र भीमाशंकर अभयारण्य भाग एक आणि भाग दोन'मधील धबधब्यातील कुंडामध्ये भिजण्यासाठी स्थानिकांबरोबर सुट्टीच्या दिवशी पुणे-मुंबईतून पर्यटक आवर्जून येत असतात. सध्या या धबधब्यांतील पाण्याला जोर असून, पोहताना पाण्याच्या प्रवाहाचा आणि खोलीचा अंदाज न आल्यास जीवघेणा अपघात होऊ शकतो. भीमाशंकर वन्यजीव अभयारण्यातील डोंगरदऱ्यांमधील जंगलवाटा पावसामुळे निसरड्या झाल्या आहेत. अनेक ठिकाणी गवत वाढल्याने वाटा पुसल्या गेल्या आहेत, अशा परिस्थितीत अपघाताची, धुक्यामुळे वाट हरविण्याची शक्यता असते. त्यामुळे पर्यटकांची सुरक्षा लक्षात घेऊन अभयारण्यातील सर्व निसर्गवाटा एक जुलै ते ३० सप्टेंबरदरम्यान पर्यटनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय आम्ही घेतला, अशी माहिती उपवनसंरक्षक (वन्यजीव) तुषार चव्हाण यांनी दिली. भीमाशंकर येथे दर्शनासाठी येणाऱ्या सर्व पर्यटकांनी अभयारण्यात फिरताना नियमांचे काटेकोर पालन करावे. परवानगीशिवाय अवैधपणे अभयारण्यात प्रवेश करू नये; तसेच प्रतिबंधित क्षेत्रात विनापरवाना प्रवेश करणाऱ्या पर्यटकांवर 'वन्यजीव संरक्षण कायद्या'अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असे चव्हाण यांनी सांगितले. भीमाशंकर येथे दर्शनासाठी येणाऱ्या सर्व पर्यटकांनी अभयारण्यात फिरताना नियमांचे काटेकोर पालन करावे. परवानगीशिवाय अवैधपणे अभयारण्यात प्रवेश करू नये; तसेच प्रतिबंधित क्षेत्रात विनापरवाना प्रवेश करणाऱ्या पर्यटकांवर 'वन्यजीव संरक्षण कायद्या'अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असे चव्हाण यांनी सांगितले.

# काळम्मावाडी धरणाच्या डोहात बुडालेल्या दोघा तरुणांचे मृतदेह सापडले

**कोल्हापूर** :. वर्षा पर्यटनाला आलेले कर्नाटक निपाणी येथील प्रतिक संजय पाटील व गणेश चंद्रकांत कदम हे काळम्मावाडी धरणासमोरील दूधगंगा नदी पात्रातील पाण्याच्या डोहात बुडाले होते. आज, मंगळवारी एनडीआरएफ'च्या टीमला रेस्क्यू करताना दोघा तरुणांचे मृतदेह हाती लागले.

कर्नाटक निपाणी येथील १२ वीचे १३ वर्गमित्र हे सोमवारी काळम्मावाडी, ता, राधानगरी येथे वर्ष पर्यटनसाठी आले होते. त्यातील गणेश चंद्रकांत कदम (वय १८ रा. आंदोलननगर निपाणी) हा युवक पोहता येत नसताना काळम्मावाडी धरणासमोरील दूधगंगा नदी पात्रातील पाण्याच्या डोहात उतरला त्याला पाण्याचा अंदाज न आल्याने तो डोहात बुडत असताना गाडीचा ड्रायव्हर प्रतीक पाटील वय वर्ष २२ हा त्याला वाचवण्यासाठी गेला. मात्र दोघांनी एकमेकाला घट्ट मिठी मारल्याने दोघेही पाण्यात बुडाले सोमवारी सायंकाळी उशिरापर्यंत त्यांचा शोध सुरू होता मात्र पावसाची संततधार सुरू असल्याने शोध मोहीम थांबवण्यात आली.

दरम्यान मंगळवारी सकाळी ११ वाजता प्रतीक पाटील तर तब्बल दोन तासांनी गणेश कदम यांचा मृतदेह एनडीआरएफ'च्या रेस्क्यू टीमला सापडला. मृतदेह पाहताच नातेवाईक आणि मित्रमंडळींनी केलेला आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता. घटनास्थळी राधानगरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक संतोष गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पी. एस. आय खंडू गायकवाड या शोधमोहीमेत सहभागी झाले होते. दोन महिन्यातील ही दुसरी घटना असून वर्षा पर्यटनाचा आनंद पर्यटकांच्या जीवावर बेतत आहे.

# पी एम जनमन योजने अंतर्गत पाटणमधील तारळे परिसरातील धनगरवाडी येथील कातकरी कुटुंबांना जातीच्या दाखल्याचे घरपोहच वितरण

**पाटण** : तारळे ग्रामपंचायत अंतर्गत धनगर वाडी येथे ४५ कुटंबाची वस्ती आहे. सदर ४५ कुटुंब हे समजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असले तरी पी एम जन मन योजने मूळे त्यांचे जीवनात आशेचा किरण निर्माण झाला आहे.

पाटण तालुक्यातील महसूल प्रशासनाने पुढाकार घेऊन जिल्हाधिकारी सातारा यांचे मार्गदर्शनाखाली पाटण तालुक्यातील तारळे मुरुड अडूल पेठ, पाटण शहर, बिबी,येथील कुटुंबांना यापूर्वीच आधार कार्ड रेशन कार्ड ,मतदान ओळखपत्र, रहिवासी दाखला इत्यादीचे वितरण केले आहे. कातकरी समाजातील कुटुंबातील मतदारांनी यावेळी प्रथमच मतदार यादीत नाव आल्याने नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांना मतदान यंत्रावर प्रथमच आपला मतदानाचा हकक बजावता आला आहे.

मूळ कातकरी समाज हा उदर निर्वाहासाठी एका ठिकाणी राहत नसतात, वेगवेगळ्या ठिकाणी ते नेहमी भटकंती करत असतात. मात्र या कुटुंबातील नवीन पिढी शिक्षण घेताना दिसत असल्याने ही कुटुंबे आता एका ठिकाणी स्थिरावत असल्याचे दिसून येत आहे.

या मुलांना शैक्षणिक कारणासाठी जातीच्या दाखल्याची गरज असते तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी देखील जातीच्या दाखल्याची आवश्यकता असते. त्यामुळे या कामी कागदपत्राची जुळवा जुळव करणे हे आव्हानात्मक काम असते.

पाटण तालुक्यात अशा कातकरी कुटुंबांना जातीचा दाखला मिळवून देण्यासाठी स्थानिक महसूल प्रशासनाने पुढाकार घेऊन तारळे येथील १९ कुटुंबातील विद्यार्थ्यांना व पालकांना जातीच्या दाखल्याचे थेट त्यांचे वस्तीवर व ग्राम पंचायत कार्यालयात जाऊन वितरण केले आहे. याप्रसंगी , तहसीलदार अनंत गुरव , मंडळ अधिकारी किशोर वाडकर , तसेच परिसरातील बबन शिंदे,अभिजित पाटील,रामभाऊ पाटील,तसेच कातकरी कुटंबाचे प्रतिनिधी रामदास वाघमारे आदी हजर होते. मुलांना घरपोहच जातीचे दाखले मिळाल्याने कातकरी कुटुंबांनी समाधान व्यक्त केले आहे.

पी एम जन मन योजने अंतर्गत पाटण तालुक्यात बहुतांश कातकरी कुटुंबांतील व्यक्तींना यापूर्वीचआधार कार्ड रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र,जातीचे दाखले इत्यादी शासकीय कागदपत्रे देण्यात आली असून कातकरी समाजातील एकही व्यक्ती यापासून वंचित राहणार नाही यासाठी स्थानिक प्रशासन प्रयत्नशील राहील

तारळे तील कातकरी वस्ती मध्ये नोंदणी करण्यात आलेले १४९ मतदार असून नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत १२० मतदारांनी मतदानाचा हकक बजावून लोकशाही मजबुतीकरण साठी हातभार लावला आहे.

# पालखी सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज : जितेंद्र दुडी

**लोणंद** : येत्या शनिवारी सातारा जिल्ह्यात आगमन होत असलेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमिवर सर्व शासकीय विभागांकडून जय्यत तयारी केली आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी यांनी दिली.



संत ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहळ्याचे (ता. ६ रोजी) रोजी सहा दिवसांच्या मुक्कामांसाठी सातारा जिल्ह्यात आगमन होत आहे. सोहळ्यातील वारकरी व भावीकांची सुरक्षा व वाहतूक व अन्य सर्व बाबींच्या तयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी यांनी लोणंद पालखीतळ, पालखी मार्ग या ठिकाणी भेट देवून पालखी सोहळ्याच्या व्यवस्थेबाबत पाहणी दौरा केला. त्यावेळी ते माध्यमांशी बोलत होते.

जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी म्हणाले की, संत ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहळा दि ६ रोजी सातारा जिल्ह्यात लोणंद या ठिकाणी मुक्कामी येत असून स्थानिक प्रशासन, नगरपंचायत, सार्वजनिक बांधकाम, वीज पुरवठा व स्वच्छता विभाग, सातारा जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी प्रशासन, आरोग्य व पाणीपुरवठा विभाग आदी विविध विभाग यांच्या वतीने सर्व तयारी करण्यात आली आहे. वारकरी व भावीकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची काळजी त्या त्या खात्यांच्या वतीने घेतली जात आहे. स्थानिक प्रशासनाने वारकऱ्यांना सर्व प्रकारच्या सोयी सुविधा पुरवून उत्तम नियोजन केले आहे. सर्व ठिकाणचे नकाशे तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे वारकरी व भावीकांची कोणत्याही प्रकारची आडचण होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे. तसेच पालखी सोहळा दरवर्षीप्रमाणे यावर्षीही धार्मिक वातावरणात व शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवन त्यांच्याकडून करण्यात आले.

यावेळेस त्यांच्या समवेत मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन, वाईचे प्रांत राजेंद्रकुमार जाधव, फलटणचे प्रांत सचिन ढोले, तहसीलदार अजित पाटील, पोलिस उपअधिक्षक राहुल धस गटविकास अधिकारी अनिलकुमार वाघमारे, सपोनि सुशील भोसले, नगराध्यक्ष सीमा खरात उपनगराध्यक्ष रवींद्र क्षीरसागर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. युवराज करपे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेश खलीपे, पाणी व स्वच्छताविभागाच्या उपमुख्य अधिकारी क्रांती बोराटे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अविनाश पाटील, नगरपंचायत मुख्याधिकारी दत्तात्रय गायकवाड,लोणंद बाजार समिती सभापती सुनिल शेळके, नगरसेवक भरत शेळके, शिवाजीराव शेळके, गणीभाई कच्छी, भरत बोडरे सागर शेळके, बंटी खरात, संदीप शेळके, गणेश शेळके, असगर इनामदार, उपअभियंता वाय एस काटकर, उपअभियंता शिवाजी रेड्डी, उपअभियंता जितेंद्र शिंदे, उपअभियंता कांचन भोईटे, मंडलाधिकारी रुपाली यादव, तलाठी शशिकांत वणवे उपस्थित होते.

# दत्तच्या क्षारपड जमीन सुधारणा प्रकल्पामुळे सभासदांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य

**शिरोळ** : दत्त कारखान्याच्या माध्यमातून उद्यान पंडित चेअरमन गणपतराव पाटील यांनी फक्त कारखान्याचा फायदा न पाहता अगदी सभासद आणि शेतकऱ्यांच्या तळागाळापर्यंत पोहोचून शेतकऱ्यांना आणि सभासदांना आर्थिक स्थैर्य कसे प्राप्त होईल आणि आपली शेती कशी फुलेल याकडे लक्ष दिले आहे. क्षारपडमुक्तीच्या माध्यमातून दत्त कारखान्याने आज अखेर ८ हजार ५०० एकर क्षेत्रात क्षारपड मुक्तीची मोहीम राबवली आहे. यापैकी ३ हजार ५०० एकर क्षेत्र पिकाखाली आल्याने गेल्या दोन वर्षात या क्षेत्रात उसाबरोबर अनेक पिके शेतकऱ्यांनी घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देणारे दत्त पॅटर्न सभासदांच्या आणि शेतकऱ्यांच्या हिताचेच काम करत असल्याचे यावरून स्पष्ट होते.



राज्यात अनेक सहकारी साखर कारखाने कार्यरत आहेत. शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी वेगवेगळे उपक्रम राबवून शेतकरी सभासदाबरोबर कारखान्याचा विकास झाला पाहिजे त्या दृष्टीने चेअरमन उद्यान पंडित गणपतराव पाटील यांचे काम आदर्शवत आहे.

'विना सहकार नही उद्धार' याप्रमाणे कारखान्याच्या माध्यमातून सहकाराबरोबर शेतकऱ्याचा ही विकास झाला पाहिजे आणि त्याच्या शेतीचाही झाला पाहिजे, हा प्रमुख उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून दत्त कारखान्याचे चेअरमन उद्यानपंडित गणपतराव पाटील यांनी सन २०१६ पासून क्षारपड मुक्तीची मोहीम डोळ्यासमोर ठेवली आणि पाण्याच्या अतिरेक वापराने क्षारपड होऊन नापीक झालेली तब्बल ३२५० हेक्टर जमीन पुन्हा पिकाऊ करण्याचा प्रयोग त्यांनी यशस्वी केला. शिरोळ तालुक्यात यशस्वी पंचवीस हजार एकर जमीनीचे वाळवंट झाल्याने हादरून गेलेल्या शेतकऱ्यांच्या जीवनात आशेचा नवा किरण निर्माण झाला आहे. शिरोळच्या दत्त पॅटर्न ने या तालुक्याच्या शेती उत्पन्नाच्या उलाढालीत हजार कोटींपेक्षा अधिक वाढ झाली आहे.

महाराष्ट्रातील हा सच्छिद्र बंदिस्त निचरा प्रणालीचा पहिलाच प्रयोग संपूर्ण देशभरात चर्चेचा ठरला आहे. याची दखल घेऊन महाराष्ट्र केंद्र सरकारने देखील दत्ताच्या क्षारपड मुक्तीला पेटंट (कॉपीराईट) दर्जा देऊन या उपक्रमाला बळकटी दिली आहे. इतकेच नव्हे तर शिरोळ तालुक्यातील सात क्षारपड जमीन सुधारणा संस्थेमार्फत १५ ४५ हेक्टर क्षेत्रावर झारपड जमीन सुधारणा प्रकल्प राबविण्याच्या प्रस्तावाला राज्य शासनाने मान्यता देऊन प्रति हेक्टरी साठ हजार रुपये अशी एकूण ९ कोटी ४५ लाख ५४ हजाराचा निधी उपलब्ध करून दिला असल्याने अनेक शेतकरी सभासदांना याचा लाभ ही मिळाला आहे. त्यामुळे क्षारपड मुक्तीची चळवळ राबवल्याने सभासद व शेतकऱ्यांच्या हजारो एकर पडीक क्षारपड जमिनीवर जोमाने ऊस डौलत असल्याने सभासद शेतकऱ्यांचा विकासही कारखान्याच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात साधला असल्याचे हे उदाहरण आहे.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवण्यासाठी तलाठी कार्यालयात दखल्यांसाठी गर्दी

**खंडाळा** : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळावा.यासाठी इच्छूक लाभार्थ्यांकडून कागदपत्रांची जुळवा - जुळव सुरु असल्याने गावा गावातील तलाठी कार्यालयात दखल्यांसाठी गर्दी दिसून आली.

राज्य शासनाने अ थ ॅ स ं क ल प ा त शेतकरी,महिलांसाठी योजना जाहीर केल्या आहेत. त्यामध्ये महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्य,त्याचबरोबर आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करणे अणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी राज्यात मुंख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना जाहीर करण्यात आली आहे.

या योजनेत लाभार्थ्याला महिना दीड हजार रुपये दिले जाणार असून त्यासाठी तहसीलदार उत्पन्न दाखला हा महत्त्वाचा निकष आहे.हाच दाखला मिळविण्याकरता प्रथम तलाठी दाखला घेणे आवश्यक असल्यामुळे खंडाळ्यासह ग्रामीण भागात तलाठी कार्यालयातून दाखल्यांसाठी गर्दी पाहायला मिळाली.

या योजनेचा कालावधी १ जुलै ते १५ जुलै असा असल्याने प्रत्येकजण कागदपत्रकांची जुळवाजुळव करण्यात व्यस्त झाला आहे. २१ ते ६० वर्ष वयोगटातील महिलांना याचा लाभ घेता येणार आहे. तसेच महाराष्ट्रातील रहिवासी,विवाहित, विधवा,घटस्फोटीत, परित्यपत्क्या आणि निराधार महिला तसेच ज्यांचे कुटुंबाचे आर्थिक वार्षिक उत्पन्न अडीच लाखापेक्षा कमी असणाऱ्यांना या योजनेचा फायदा मिळणार आहे.

त्यासाठी अर्ज पोर्टलवर, मोबाईल ॲप, सेतू सुविधा केंद्र, किंवा गावातील अंगणवाडी सुविधा केंद्रात भरावयाचे आहेत.अडीच लाखापेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्यांना,इन्कमटॅक्स भरणाऱ्यांना,कुटुंबातील कोणी सरकारी नोकरीत असेल, किंवा निवृत्ती वेतन घेत असेल, ज्यांच्याकडे ५ एकरापेक्षा जास्त जमीन असेल किंवा कुटुंबातील कोणाकडे चार चाकी वाहन असेल (ट्रॅक्टर सोडून) अशा व्यक्तींच्या कुटुंबातील महिलांना याचा लाभ मिळणार मिळणार नाही.तालुक्यातील खंडाळ्यासह गावा गावांसाठी असणाऱ्या तलाठी कार्यालयात येणाऱ्या महिलांचीच सकाळपासून मोठी गर्दी असल्याचे चित्र दिसून आले.

# सातारा कास रस्त्यावर झाड कोसळले

## कास पठार समितीच्या कर्मचाऱ्यांनी झाड हटविल्यानंतर वाहतूक सुरळीत



**कास पठार** : सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात गेल्या चार-पाच दिवसापासून पावसाने जोर धरला असून त्यामुळे ठीक ठिकाणी झाडे कोसळणे इत्यादी प्रकार सुरू आहेत मंगळवारी सकाळी सात वाजता सातारा कास रस्त्यावर आटळी गावचे हद्दीत हॉटेल सह्याद्री पुष्प च्या जवळ भले मोठे झाड रस्त्यावरच कोसळल्याने दोन्ही बाजूने येणाऱ्या जाणाऱ्या गाड्या जागेवरतीच थांबल्या होत्या सकाळी पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांनी कास पठार समितीचे माजी अध्यक्ष सोमनाथ जाधव यांना सांगितल्यानंतर त्यांनी तातडीने कास पठारावरती फोन करून कास पठार कार्यकारी समितीच्या कर्मचाऱ्यांना बोलवले कास पठार समितीचे माजी उपाध्यक्ष दत्तात्रय किर्दत विद्यमान उपाध्यक्ष रामचंद्र उंबरकर व कर्मचाऱ्यांची टीम तातडीने त्या ठिकाणी उपस्थित राहून झाड हटवल्यामुळे सातारा कास रस्त्यावरील वाहतूक सुरळीत झाली ज्या ठिकाणी झाड पडले त्याच्या आजूबाजूला वनविभागाची हद्द असल्यामुळे या ठिकाणी मोठमोठी झाडे रस्त्यावरतीच वाकलेली आहेत ही झाडे वाकलेली झाडे तोडली नाही तर भविष्यात मोठी घटना या परिसरात घडू शकते यासंदर्भात वन विभागाने तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे.

झाड पडल्यानंतर दोन्ही साईडला गाड्यांची रांग लागली होती त्यावेळी सातारा मेढा एकिव मार्गे ही गाडी मेढ्याच्या दिशेने निघाली होती या गाडीत ड्रायव्हर कंडक्टर निवांत बसून होते एसटी सोडून बाकीच्या गाडीतील सर्व माणसे झाड हाटविण्यासाठी प्रयत्न करत होते एस टी तील प्रवासी सुद्धा झाड हटवण्यासाठी मदत करत होते झाड हाटवल्यानंतर एक लेन मोकळी झाली त्यानंतर सुद्धा सातारा मेढा एकीव मार्गे जाणाऱ्या गाडीचे ड्रायव्हर गाडी पुढे घेण्यास तयार नव्हते छोटीशी फांदी रस्त्याच्यावर असल्यामुळे गाडी पुढे न घेता त्याच ठिकाणी बसून होते त्यानंतर कास पठार समितीच्या कर्मचाऱ्यांची फांदी काढल्यानंतर नंतर ड्रायव्हरने गाडी पुढे घेतली.

# निवडणूक विभागाच्यावतीने मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाला सुरुवात

**शिरोळ** : शिरोळ विधानसभा मतदारसंघात १२000 च्या वर मतदार मृत्यू झालेले आहेत ती नावे वगळण्यात आली असून त्याबाबत जिवंत व्यक्तीचे नाव मयत यादीमध्ये असल्यास खातरजमा करण्यासाठी १४ जुलै पर्यंत मुदत निवडणूक आयोगाने दिली आहे याची नोंद बीएलओकडे द्यावी , तसेच वर्धापकाळाने अंतरुणावर असलेल्या रुग्ण मतदारांचे मतदान घरी जाऊन घ्यावे, ४0% अधिकृत दिव्यांगाची यादी तयार करणे मतदार यादी यादीत पुसट फोटो असल्यास रंगीत फोटो बीएलओ यांच्याकडे देण्यात यावा अशी माहिती शिरोळ तालुक्याचे तहसीलदार अनिल कुमार हेळकर यांनी तहसीलदार कार्यालयाच्या दालनात विविध पक्षाचे राजकीय नेते कार्यकर्ते सामाजिक कार्यकर्ते पत्रकार यांच्या आयोजित केलेल्या बैठकीत दिली.

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा निवडणूक विभागाच्यावतीने मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे. असे सांगून तहसीलदार हेळकर पुढे म्हणाले मतदार यादी मध्ये १२000 च्या वर मतदार मयत असल्याचे दिसून येत आहे या कार्यालयाकडे केवळ १५ तक्रारी आल्या होत्या त्यांचा पुन्हा सहा नंबरचा फॉर्म भरून पुढच्या निवडणुकीत त्यांना मतदानाचा हक्क प्राप्त करून देण्यात आला आहे त्याच धर्तीवर सदरची यादी गाववार बी एल ओ तर्फे देण्यात आली आहे त्याची पडताळणी करून जर जिवंत व्यक्तीचे नाव मृत यादीमध्ये असल्यास सहा नंबरचा फॉर्म भरून बीएलओकडे देण्यात यावा तसेच घरी आजारी असलेल्या वयस्कर इसमाचे मतदान त्यांच्या घरी जाऊन घेण्यासाठी बी एल बोकडे यादी तयार करण्याचे काम देण्यात आले आहे दिव्यांग हा ४0% दिव्यांग असला पाहिजे अशाची यादी तयार करण्याचे काम ही सोपवण्यात आली आहे मतदार यादीत सध्या आपला फोटो पुसट असेल तर त्या ठिकाणी रंगीत फोटो देण्याची सोय करण्यात आली आहे याची मुदत १४ जुलै पर्यंत आहे याची नोंद सर्व मतदार कार्यकर्त्यांनी घ्यावी असे सांगितले

तहसीलदार हेळकर अधिक माहिती देताना म्हणाले मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत बीएलओ मार्फत घरोघरी सर्वेक्षण, मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना, मतदार यादीतील तफावत दूर करणे, अस्पष्ट, निकृष्ट दर्जाचे फोटो बदलून चांगल्या प्रतीचे फोटो वापरणे, मतदार यादीमधील विनिर्देशन आणि मानवेतर प्रतिमा, जेथे आवश्यक असेल तेथे बदल करणे, विभाग, भागांची पुनर्रचना करणे, सीमांच्या पुनर्रचनेचे अंतिम रूप देणे आणि मतदान केंद्रांच्या यादीची पुनरीक्षण कार्यक्रम असा

**मतदार यादीवरील दावे व हरकती स्वीकारणे : २५ जुलै ते १ ऑगस्ट**

विशेष मतदार नोंदणी कार्यक्रम : मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून मान्यता घेणे. कंट्रोल चार्ट अद्ययावतीकरण, नमुना १ ते ८ तयार करणे, १ जुलै २०२४ च्या अर्हता निश्चित करण्यावर दावे व हरकती निकाली काढणे,

आयोगाची परवानगी मिळवणे, डेटाबेस अद्ययावत करणे व पुरवणी यादी तयार करणे : १९ ऑगस्टपर्यंत

अंतिम मतदार यादी प्रसिद्धी :२० ऑगस्ट १८ वर्षे पूर्ण करणाऱ्यांची नोंदणी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक विभागाची तयारी सुरू झाली असून, त्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित प्रारूप मतदार यादी २५ जुलैला प्रसिद्ध होत आहे. म्हणजेच या दिवसापर्यंत ज्यांची वयाची १८ वर्षे पूर्ण झाली आहे अशा युवक - युवतींचा मतदार यादीत समावेश होऊ शकतो.नोंदणी कशी कराल?

ऑफलाइन :आपआपल्या ऑनलाइन :तालुक्यातील तहसील कार्यालयातील निवडणूक विभागाकडे कागदपत्रांसह अर्ज सादर करून मतदार यादीत नाव नोंदणी करता येईल. ऑनलाइन नोंदणीसाठी वोटर हेल्पलाइन ॲपवर किंवा वोटर सर्व्हिस पोर्टलवर जाऊन माहिती भरावी. तरुणांनी मतदार नोंदणीसाठी सहकार्य करण्याची गरज आहे. असेही तहसीलदार यांनी सांगितले

# साताऱ्यात हॉटेल काउंटरची तोडफोड दहा हजार रुपये लांबवले

**सातारा** : पैसे देण्यास नकार दिल्यामुळे संतप्त झालेल्या काकाने पुतण्याच्या हॉटेल काउंटरची तोडफोड करून त्याच्या गल्ल्यातील दहा हजार रुपये लांबवल्याची घटना बालाजी ढाबा येथे घडली आहे. याप्रकरणी प्रसाद प्रतापसिंह राजेभोसले वय २२ राहणार विसावा कॅम्प यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यातील दिली आहे.

सचिन प्रभाकर भोसले यांच्या विरोधात तक्रार देण्यात आली आहे. दिनांक २९ जून रोजी रात्री साडे अकराच्या दरम्यान सचिनराजे भोसले हे बालाजी ढाबा येथे हॉटेलमध्ये आले व त्यांनी फिर्यादीकडे पैशाची मागणी केली पुतण्याने पैसे देण्यास नकार दिल्याने संतप्त सचिन राजे भोसले यांनी फिर्यादीचा चुलत भाऊ शिवम याला शिवीगाळ करून धक्काबुक्की केली व हॉटेलच्या काउंटरची आणि कम्प्युटरची मोडतोड केली .तसेच काउंटर मधील दहा हजार रुपये जबरदस्तीने चोरून नेल्या याप्रकरणी पोलीस हवालदार बोडरे अधिक तपास करत आहेत.